# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/१२/२०१७

**१) मोटार सायकलच्या वाहनावरील नियत्रंण सुटुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २३/१२/२०१७ चे ११.१३ वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा चुलत भाऊ मृतक मनिष भाऊराव पारधी वय २६ वर्ष, रा. दावेझरी हा त्याचे मोटार सायकल क्रमांक एमएच ३६/एन –९०८२ ने सिधपुरी येथुन दावेझरी येथे जात असता त्याची मोटार सायकल भरधाव वेगात निष्काळजीपणे चालवुन वाहनावरील नियत्रंण सुटुन मोटार सायकल वरुन खाली पडुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सहसराम सेवकराम पारधी वय ३१ वर्ष, रा. दावेझरी यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. कोरेटी पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२)संगनमत करुन भांडण करुन लाकडी उभारीने व थापड बुक्यांनी मारुन जखमी केले. . :–**

दिनांक २३/१२/२०१७ चे १३.५४ वाजता दरम्यान यातील फिर्यादी खुशाल गजानन बुरडे वय १९ वर्ष, रा. हा ट्रॅक्टर चालक संतोष सोबत बोलत असता आरोपीतांनी तु सरपंचाचा पुतण्या आहेस? म्हणुन काही न बोलता फिर्यादीला थापड बुक्यांनी व उभारीने मारहान केली तसेच फिर्यादीचा भाऊ मिथुन गजानन बुरडे वय १६ वर्ष, व मित्र भांडण सोडवविण्या करीता गेले असता आरोपीतांनी फिर्यादीचा भाऊ यांचे डावे खांदयावर व मित्र याचे डावे पायाला लाकडी उभारीने व थापड बुक्यांनी मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२५,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) शेतातील मोटार पंपची चोरी . :–**

दिनांक २०/१२/२०१७ ते २१/१२/२०१७ चे. दरम्यान यातील फिर्यादी एकनाथ विश्वनाथ लांजेवार वय ५२ वर्ष, रा. झोडे मोहल्ला सेंदुरवाफा यांचे शेता शेजारील नाल्यावर लावेलेली १ शक्ती मोनो कंपनीची १.५ एचपीची मोटार पंप किंमती ५,०००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) कॉपर तारची चोरी . :–**

दिनांक २३/१२/२०१७ चे १४.३० ते १५.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने ट्रान्सफार्म क्र ४३८२०१८,४३८२०३७,४३८२०४७, ४३८२०६१ चे फ्युज किट कॅट व डॅश व त्यामधील कॉपरचे तार किंमती ७५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी राहुल मानिकराव डांबरे वय ४३ वर्ष, सहायक अभियंता म.रा.वि.वी कंपनी तुमसर यांचे लेखी रिपोर्ट पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलच्या धडकेत तरुणी जखमी . :—**

दिनांक २३/१२/२०१७ चे ०८.०० ते ०८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही लापरवाहीने, हयगयीने चालवुन फिर्यादी जखमी मुलगी कु. कविता गुलाब शेंडे वय १८ वर्ष हीचे सायकलला वैनगंगा साखर कारखाण्या जवळ नरसिंहटोला येथे धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी गुलाब दगडु शेंडे वय ४२ वर्ष, रा. मुंढरी खुर्द याचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बावणकर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**६) ट्रक पलटी होवुन एक जखमी . :—**

दिनांक २१/१२/२०१७ चे ०३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने, निष्काळजीपने चालवुन ट्रक पलटी करुन सोबत असलेला क्लीनर राकेश रामचंद्र मसराम वय २८ वर्ष, रा. पोहरा यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी जावेद अलीद छववारे वय ३३ वर्ष, याचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**७) अज्ञात ट्रेलरची मोटार सायकलला धडक लागुन एकाचा मृत्यु . :—**

दिनांक २३/१२/२०१७ चे १४.३० ते १४.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी रुतीक डेंगुराज गिऱ्हेपुंजे वय १५ वर्ष, रा. राजीव गांधी चौक जेलचे मागे भंडारा हा मृतक— रोहीत सुब्बाराव घुमाड वय १५ वर्ष, रा. रुक्मीनी नगर खात रोड भंडारा याचे सोबत मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन ५०४० ने भंडारा कडुन नागपुर कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रेलर भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन ट्रेलर बॉडीची मोटार सायकलला साई प्रसाद हॉटेल पुढे धडक लागल्याने फिर्यादी याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४/ १८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) मोबाईल फोन वरुन एटीएम नंबर व ओटीपी नंबर विचारुन एटीएम खात्यातुन पैश्याची काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/१२/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मोबाईल क्र. चा धारक आरोपीने फिर्यादीला फोन करुन मी स्टेट बॅकेचा मॅनेजर बोलतो असे सांगुन तुम्ही अकाऊंटला आधार कार्ड जोडले का? असे म्हणुन एटीएम नंबर व सीव्हीव्ही नंबर व ओटीपी नंबर विचारुन फिर्यादीच्या खात्या मधुन २५,०००/—रु. काढुन घेतल्याने फिर्यादी प्रदीप हरीभाऊ बलमवार वय ४५ वर्ष, रा. वेलकम कॉलोनी खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(क) आयटी ॲक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. सिडाम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

**९) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी .  :–**

दिनांक २३/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, मोहाडी व वरठी येथे अवैध /जुगार दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २९ लिटर हातभट्टी दारू किंमती २१००/–रु. व १ लिटर ८० मिली लिटर देशी दारु किंमती ३००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १६१०/–रु. असा एकुण ४,०१०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २३/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैधी प्रवासी – ०१ तीन सिटर वाहनांवरती– १२ केसेस व ईतर वाहनांवरती –५८ केसेस करण्यात आलेले आहे.

**(पोनी. बी.डी.बन्सोडे)**
**नियत्रंण कक्ष अधिकारी**
**भंडारा**
दुरध्वनी.क्र. ९६६४००२२६४

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.